माहे जुलै ते ऑक्टोबर २००५ मध्ये अतिवृष्टी व महापूर यामुळे शेतीपिकांचे व फळपिकांचे नुकसान झालेल्या आपदग्रस्त शेतक-यांना मदत देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
कृषि पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक:नैसआ-१००५/प्र.क्र.२९०/१०-अ,
मंत्रालय विस्तार,मुंबई-४०००३२,
दिनांक :- १४ जुलै,२००६.

वाचा:-

१)शासन निर्णय,महसूल व वन विभाग

१.क्रमांक-सीएलए-०७-०५/प्र.क्र.१९२(शेती)/म-३,दिनांक १६.९.२००५,

२. क्रमांक-एससीवाय०६-०५/प्र.क्र.४६(भाग-२)/म-११,दिनांक ४.१०.२००५.

३. क्रमांक एससीवाय ०६-०५/ प्र.क्र.४६/ म-११,दिनांक २४.१०.२००५.

४. क्रमांक एससीवाय ०६-०५/प्र.क्र.४६/म-११,दिनांक २५.१०.२००५.

५. क्रमांक एससीवाय ०६-०५/प्र.क्र.४६/म-११.दिनांक १०.११.२००५.

६. क्रमांक एससीवाय०६-०५/प्र.क्र.४६/(भाग-२)म-११,दिनांक १४.११.२००५.

७. क्रमांक- एससीवाय ०६-०५/ प्र.क्र.४६(भाग-२)/म-११(१),दिनांक २८.११.२००५

३७४२२ ८.क्रमांक- एससीवाय-०४०६/प्र.क्र.१५/म-११.दि.१६ मे,२००६

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
शाखा - GB
आवक नं. -
29 JUL 2006
विशेष नोंद वही नं. -
कार्यविवरण नं. -
प्र. लि. नि.उ.जि. जिल्हाधिकारी

९. क्रमांक-एससीवाय-०४०६/प्र.क्र.१५/म-११.दिनांक २७ जून,२००६

१०. क्रमांक-एससीवाय-०४०६/प्र.क्र.१५/म-११.दिनांक ७ जुलै,२००६

२) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग

१. क्रमांक-नैसआ-१००५/प्र.क्र.२९०/१०-अ.दिनांक५.१०.२००५

२. क्रमांक -नैसआ १००५/प्र.क्र.३३०/१०-अ,दिनांक २७.१०.२००५.

३. क्रमांक -नैसआ-१००५/प्र.क्र.२९०/१०-अ,दिनांक १४.११.२००५.

४. क्रमांक -नैसआ-१००५/प्रक्र.२९०/१०-अ,दिनाक २८ नोव्हेंबर,२००५.

५. क्रमांक -नैसआ १००५/प्रक्र.२२/(भाग-२)१०-अ. दिनांक १५ डिसेंबर,२००५.

६. क्रमांक-नैसआ १००५/प्र.क्र.२९०/१०-अ,दिनांक २५ मे,२००६.

७.क्रमांक-नैसआ १००५/प्र.क्र.२९०/१०-अ,दिनांक ३० जून,२००६

शासन निर्णय:-

जुलै ते ऑक्टोबर २००५ या कालावधीत राज्यात झालेल्या अभूतपूर्व अतिवृष्टी व महापुरामुळे राज्याच्या विविध भागात अतिवृष्टी होऊन शेतीपिकाचे / फळबागांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. शेतक-यांच्या झालेल्या नुकसानीचा विचार करुन शासनाने संदर्भाधिन शासन निर्णय दिनांक १६.९.२००५ व दिनांक २४.१०.२००५ अन्वये एक "विशेष बाब" म्हणून बाधित झालेल्या आपदग्रस्त शेतक-यांना मदत देण्यात आली आहे.

२. त्यानुसार कृषि व पदुम विभागाच्या संदर्भाधिन शासन निर्णय दिनांक ५-१०-२००५, २७-१०-२००५,१४-११-२००५, २८-११-२००५, , १५-१२-२००५ ,२५-५-०६ व दिनांक २७-६-२००६

अन्वये एकुण ४२९.६० कोटी एवढे अनुदान वितरित करण्यात आलेले आहे. तथापि आपदग्रस्त शेतक-यांना मदत वाटप करण्यासाठी अनुदानाची मागणी लक्षात घेऊन आणखी अनुदान वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

२.१ जुलै ते ऑक्टोबर २००५ मध्ये नंतर झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यातील शेतीपिकांचे फळबागांचे ५० टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झालेल्या अशा आपदग्रस्त शेतक-यांना शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार मदत देण्यासाठी महसूल व वन विभागाने कृषि विभागाला रु.४२९.६० कोटी रक्कमेचे वितरण करण्यात आले आहे. परभणी व नांदेड जिल्हयात प्रलंबित असलेल्या मागणीपोटी आणखी अनुक्रमे रु.६.०० कोटी ( रुपये सहा कोटी फक्त) व रु.९.०० ( रुपये नऊ कोटी फक्त) असे एकूण रु.१५.०० कोटी ( रुपये पंधरा कोटी फक्त)इतके अनुदान महसूल व वन विभागाने आता उपलब्ध करुन दिले असून कृषि व पदुम विभागास सदर अनुदान खर्च करण्यास प्राधिकृत केले आहे.

२.२ आपदग्रस्त शेतक-यांना वरीलप्रमाणे मदत देण्यासाठी " मागणी क्रमांक सी-६,२२४५-नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य-०२ पूर चक्रीवादळे इत्यादी १०१ अनुग्रह सहाय्य १०१ (०४)(०५) इतर बाबी (२२४५ ०२४४) (योजनेतर ) " या लेखाशिर्षाखाली सन २००६-०७ करिता उपलब्ध झालेल्या रु.१५.०० कोटी (रुपये पंधरा कोटी फक्त) अनुदानाची रक्कम चालू वित्तीय वर्षात सन २००६-०७ मध्ये खर्च करण्यासाठी आयुक्त (कृषि) महाराष्ट्र राज्य,पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच या निधीची नांदेड व परभणी जिल्हाला अनुक्रमे रु.९.०० कोटी व रु.६.०० कोटी वितरण करण्यास आयुक्त (कृषि),कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

२.३ कृषि आयुक्तालयास विनंती करण्यात येते की,सदर रु.१५.०० कोटी (रुपये पंधरा कोटी फक्त) अनुदानाचे प्रत्यक्ष नियंत्रण अधिका-यांना वितरण करण्यापूर्वी , आतापर्यन्त वितरित केलेल्या रक्कमेच्या खर्चाचा तपशील या विभागाकडे आणि महसूल वन विभागाकडे पाठवावा.

२.४ कृषि आयुक्तालयाने याच प्रयोजनासाठी आणखी निधीची मागणी करतांना जिल्हानिहाय अनुदानाचे वाटप, प्रत्यक्ष लाभार्थ्यांना वितरण आणि शिल्लक निधी याबाबतची माहिती न चुकता द्यावी.

२.५ आहरण व संवितरण अधिका-यांनी कोषागार / उपकोषागार यांना पाठविण्यात येणा-या बिलासोबत जोडल्या जाणा-या कॉम्प्युटर स्लिपमध्ये गौण /उपशिर्षाच्या " गणक यंत्र संकेतांचा न चुकता उल्लेख करावा असे आदेश कृपया संबंधित अधिका-यांना नियंत्रण अधिकाऱ्यानी द्यावेत.

३. वरील प्रमाणे आपदग्रस्त शेतक-यांना द्यावयाची मदत आणि अनुदान वाटप करावयाची अनुसरावयाची पध्दत जुलै,२००५ ते ऑक्टोबर २००५ मधील आपदग्रस्तांसाठी शासन निर्णय क्रमांक नैसआ १००५/प्र.क्र.२९०/१०-अे, दिनांक ५ ऑक्टोबर,२००५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील.

४. हा शासन निर्णय महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक एस सी वाय -०४०६/प्र. क्र. १५/म-११,दिनांक ४ जुलै, २००६ अन्वये त्या विभागाने कृषि विभागास प्राधिकृत केल्यानुसार व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५८९/०६/व्यय-९,दिनांक १९ जून २००६ आणि क्रमांक ४३९/अर्थ-४, दिनांक २२ जून,२००६अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(अ. रा. जगताप )

कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.

मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव,